नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

| वर्ष - २ रे<br>Year - 2nd | अंक - २०९<br>Issue - 209 | वार सोमवार दि. १६ डिसेंबर २०२४<br>Blow- Monday Date 16 December 2024 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com<br>वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४<br>Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये<br>Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026<br>ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com |
|---|---|---|---|---|---|---|

## महायुतीच्या मंत्रिमंडळाचा विस्तार; ३९ जणांनी घेतली गोपनियतेची शपथ

### भाजपच्या सर्वाधिक १९ जणांचा समावेश तर शिवसेनेच्या ११, राष्ट्रवादी काँग्रेसच्या ९ जणांचा समावेश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नागपूर/प्रतिनिधी : राज्य सरकारच्या मंत्रिमंडळाचा बहुप्रतिक्षीत विस्तार आज संपन्न झाला. नागपुरातील राजभवनात दिमाखदार सोहळ्याचं आयोजन केलं होतं. उद्यापासून हिवाळी अधिवेशनाला सुरुवात होत आहे. त्याच्या एक दिवस आधी महायुतीच्या मंत्रिमंडळ विस्तार करण्यात आला. महायुतीचं सरकार सत्तेवर आल्यानंतर १० दिवसांनंतर मंत्रिमंडळ विस्तार संपन्न झाला.

महायुतीच्या ३९ आमदारांनी आज मंत्रिपदाची शपथ घेतली. यामध्ये भाजपच्या सर्वाधिक १९ जणांचा समावेश आहे. तर शिवसेनेच्या ११, तर राष्ट्रवादी काँग्रेसच्या ९ जणांचा समावेश आहे. गेल्या मंत्रिमंडळातील काही जणांना डच्चू देत यंदा महायुतीमधील तिन्ही पक्षांनी मिळून २५ नवे चेहरे दिले आहेत.

**२५ नव्या चेहऱ्यांना संधी, अकरा जणांना मिळाला डच्चू**

शपथ घेतलेल्या आमदारांची संपूर्ण यादी-

१. चंद्रशेखर बावनकुळे (भाजप) २. राधाकृष्ण विखे पाटील (भाजप) ३. हसन मुश्रीफ (राष्ट्रवादी) ४. चंद्रकांत पाटील (भाजप) ५. गिरीश महाजन (भाजप) ६. गुलाबराव पाटील (शिवसेना) ७. गणेश नाईक (भाजप) ८. दादा भुसे (शिवसेना) ९. संजय राठोड (शिवसेना) १०. धनंजय मुंडे (राष्ट्रवादी) ११. मंगलप्रभात लोढा (भाजप) १२. उदय सामंत (शिवसेना) १३. जयकुमार रावल (भाजप) १४. पंकजा मुंडे (भाजप) १५. अतुल सावे (भाजप) १६. अशोक उईके (भाजप) १७. शंभुराज देसाई (शिवसेना) १८. आशिष शेलार (भाजप) १९. दत्तात्रय भरणे (राष्ट्रवादी काँग्रेस) २०. अदिती तटकरे (राष्ट्रवादी काँग्रेस) २१. शिवेंद्रराजे भोसले (भाजप) २२. माणिकराव कोकाटे (राष्ट्रवादी काँग्रेस) २३. जयकुमार गोरे (भाजप) २४. नरहरी झिरवळ (राष्ट्रवादी काँग्रेस) २५. संजय सावकारे (भाजप) २६. संजय शिरसाट (शिवसेना) २७. प्रताप सरनाईक (शिवसेना) २८. भरत गोगा-वले (शिवसेना) २९. मकरंद पाटील (राष्ट्रवादी) ३०. नितेश राणे (भाजप) ३१. आकाश फुंडकर (भाजप) ३२. बाबासाहेब पाटील (राष्ट्रवादी काँग्रेस) ३३. प्रकाश आबिटकर (शिवसेना) ३४. माधुरी मिसाळ (भाजप) ३५. आशिष जैस्वाल (शिवसेना) ३६. पंकज भोयर (भाजप) ३७. मेघना बोर्डीकर (भाजप) ३८. इंद्रनील नाईक (राष्ट्रवादी काँग्रेस) ३९. योगेश कदम (शिवसेना)

**कोणकोणते नवे चेहरे?**

चंद्रशेखर बावनकुळे, गणेश नाईक, जयकुमार रावल, पंकजा मुंडे, अश-ोक उईके, आशिष शेलार, दत्तात्रय भरणे, शिवेंद्रराजे भोसले, माणिकराव कोकाटे, जयकुमार गोरे, नरहरी झिरवळ, संजय सावकारे, संजय शिरसाट, प्रताप सरनाईक, भरत गोगावले, मकरंद पाटील, नितेश राणे, आकाश फुंडकर, बाबासाहेब पाटील, प्रकाश आबिटकर, माधुरी मिसाळ, आशिष जैस्वाल, पंकज भोयर, मेघना बोर्डीकर, इंद्रनील नाईक.




**कोणाकोणाला डच्चू?**

सुधीर मुनगंटीवार, विजयकुमार गावित, रविंद्र चव्हाण, सुरेश खाडे, तानाजी सावंत, अब्दुल सत्तार, दीपक केसरकर, छगन भुजबळ, दिलीप वळसे-पाटील, अनिल पाटील, संजय बनसोडे.

## आमचं मंत्रीमंडळ सर्वसमावेशक : मुख्यमंत्री फडणवीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नागपूर : महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीत महायुतीला मोठं यश मिळूनही महायुतीला सत्तास्थापनेसाठी १२ दिवस व मंत्रिमंडळ विस्तारासाठी आणखी १० असे मिळून एकूण २२ दिवस लागले. महायुतीने २८८ पैकी तब्बल २३५ जागा जिंकल्या आहे. त्यानंतर राज्यात महायुतीचं सरकार स्थापन झालं. ५ डिसेंबर रोजी देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्रीपदाची आणि एकनाथ शिंदे, अजित पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. त्यानंतर आज (१५ डिसेंबर) महायुती सरकारच्या मंत्रिमंडळाचा विस्तार पार पडला. नागपुरात आयोजित शपथविधी समारंभात ३३ कॅबिनेट मंत्र्यांनी आणि ६ राज्यमंत्र्यांनी शपथ घेतली. राज्यात याआधी देखील महायुतीचंच सरकार होतं. मात्र, महायुतीच्या नव्या सरकारमध्ये २० नव्या चेहऱ्यांना संधी देण्यात आली आहे. तर, दुसऱ्या बाजूला अनेक माजी मंत्र्यांना, महायुतीमधील मोठ्या नेत्यांना डावलण्यात आलं आहे. या मोठ्या नेत्यांना पक्षांनी का डावललं असा प्रश्न सर्वांना पडला आहे. यावर नव्या सरकारच्या पहिल्या कॅबिनेट बैठकीनंतर घेतलेल्या पत्रकार परिषदेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उत्तर दिलं.



देवेंद्र फडणवीस म्हणाले, आम्ही वेगवेगळ्या समाजांना, जिल्ह्यांना मंत्रिमंडळात प्रतिनिधित्व दिलं आहे. यावर त्यांना प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींनी विचारलं की अनेक ज्येष्ठ नेत्यांना मंत्रिमंडळात स्थान दिलेलं नाही. अनेक माजी मंत्री या मंत्रिमंडळात दिसत नाहीत. याची काय कारणं आहेत? यावर देवेंद्र फडणवीस म्हणाले, यामागे वेगवेगळी कारण आहेत. मी माझ्या पक्षापुरतं उत्तर देईन. अनेकदा काही मंत्र्यांना पक्षांतर्गत कारणांमुळे मंत्रिमंडळात घेतलं जात नाही. उदाहरणार्थ पक्षाने एखाद्या नेत्याला वेगळी जबाबदारी द्यायचं ठरवलं असेल तर त्या नेत्याला आम्ही मंत्रिमंडळात घेत नाही. भाजपात कोणाला पक्षात मोठी जबाबदारी द्यायची असेल तर आम्ही त्यांना मंत्रिमंडळात स्थान देत नाही. तसेच असेही असू शकतं की एखाद्या नेत्याला त्याच्या कामगिरीमुळे मंत्रिमंडळात स्थान देणं टाळलेलं असू शकतं.

देवेंद्र फडणवीस यांच्या नव्या सरकारमध्ये भाजपाचे अनेक वरिष्ठ नेते, माजी मंत्री दिसत नाहीत. सुधीर मुनगंटीवार, रवींद्र चव्हाण ही त्यापैकी प्रमुख नावं आहेत.


देवेंद्र फडणवीस म्हणाले, आम्ही आमच्या मंत्रिमंडळात वेगवेगळ्या समाजांना स्थान दिलं आहे. ४० टक्के नवे नेते या मंत्रिमंडळात आहेत. सर्व प्रकारचे चेहरे आहेत. जुने जाणते नेते देखील या मंत्रिमंडळात आहेत. आम्ही अनेक महिलांना देखील संधी दिली आहे. वेगवेगळ्या समाजांना संधी दिली आहे. ओबीसी, मराठा, धनगर, आदिवासी, अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींना मंत्रिमंडळात प्रतिनिधित्व दिलं आहे. आमचं मंत्रिमंडळ सर्वसामावेशक असं आहे.

## प्रसिद्ध तबला वादक झाकीर हुसैन यांची प्रकृती गंभीर, अमेरिकेतील रुग्णालयात अतिदक्षता विभागात उपचार सुरु

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : प्रसिद्ध तबला वादक, अभिनेते, संगीतकार झाकीर हुसैन यांची प्रकृती बिघडली आहे. झाकीर हुसैन यांना अमेरिकेतील सॅनफ्रॅन्सिस्को येथील रुग्णालयातील अतिदक्षता विभागात उपचार सुरु आहेत. त्यांना हृदयासंबंधीचा त्रास जाणवतो आहे. त्यांचे मित्र आणि प्रसिद्ध बासरीवादक राकेश चौरासिया यांनी ही माहिती दिली आहे. अमेरिका स्थित झाकीर हुसैन यांना रक्तदाबासंबंधीचा त्रास जाणवतो आहे अशी माहिती झाकीर हुसैन यांच्या एका निकटवर्तीयाने दिली.

झाकीर हुसैन हे सुप्रसिद्ध तबलावादक अल्लाह राखा खान यांचे पुत्र आहेत. झाकीर हुसैन यांनी अनेक भारतीय आणि परदेशी चित्रपटांना संगीत दिलं आहे. 'साझ' या सिनेमात त्यांनी अभिनयही केला आहे. झाकीर हुसैन यांनी वडील अल्लाह राखा खान यांच्यासह तबला वादनाचे धडे वयाच्या सातव्या वर्षापासून गिरवण्यास सुरुवात केली. तसंच वयाच्या १२ व्या वर्षापासून झाकीर हुसैन देशभरात त्यांनी तबला वादन परफॉर्म करण्यास सुरुवात केली.



१९८८ मध्ये झाकीर हुसैन यांना पद्मश्री, २००२ मध्ये पद्मभूषण, २०२३ मध्ये पद्मविभूषण या पुरस्कारांनी गौरवण्यात आलं आहे. तसंच १९९० मध्ये त्यांना संगीत नाटक अकादमीचा संगीत पुरस्कारही मिळाला होता. २००९ मध्ये झाकीर हुसैन ५१ व्या ग्रॅमी पुरस्काराने गौरवण्यात आलं होतं. उल्लेखनीय बाब ही आहे की झाकीर हुसैन यांना त्यांच्या कारकिर्दीत ७ वेळा ग्रॅमी पुरस्कारासाठी नामांकन मिळालं होतं त्यापैकी चारवेळा त्यांना या पुरस्काराने गौरवण्यात आलं.

झाकीर हुसैन यांचं खरं आडनाव कुरेशी असं आहे. मात्र त्यांना हुसैन असं आडनाव देण्यात आलं. झाकीर हुसैन यांनी १९८९ या वर्षी हीट अँड डस्ट या सिनेमातून त्यांनी अभिनय केला होता. २०१६ मध्ये झालेल्या ऑल स्टार ग्लोबल कॉन्सर्टमध्ये सहभागी होण्यासाठी अमेरिकेचे माजी अध्यक्ष बराक ओबाबा यांनी झाकीर हुसैन यांना व्हाईट हाऊसमध्ये आमंत्रित केलं होतं. व्हाईट हाऊसमध्ये कला सादर करणारे झाकीर हुसैन हे पहिले संगीतकार ठरले. झाकीर हुसैन यांनी १९७८ मध्ये इटालियन अमेरिकन कथ्थक डान्सर अँटोनिया मिनेकोला यांच्याशी लग्न केलं. या जोडप्याला दोन मुली आहेत.

## नागरिकांच्या विश्वासाचा हा विजय; हा विजय कधीही आमच्या डोक्यात जाणार नाही : फडणवीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नागपूर : राज्यातील महिला, विविध जाती-जमातींचे नागरिक यांनी महायुतीला विजयी केले. नागरिकांच्या विश्वासा-चा हा विजय आहे. हा विजय कधीही आमच्या डोक्यात जाणार नाही. ही सत्ता आम्हाला कायम जमिनीवर ठेवेल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर फडणवीस रविवारी पहिल्यांदाच नागपुरात आले. त्यांच्या स्वागतासाठी काढण्यात आलेल्या रॅलीच्या समारोपप्रसंगी त्यांनी नागरिकांशी संवाद साधला. त्यावेळी, त्यांनी महाराष्ट्र बदलण्यासाठी हे सरकार काम करणार असल्याचे आश्वासन दिले.

जागोजागी होणार फुलांचा वर्षाव, ढोल-ताशांचा गजर आणि नागरिक आणि कार्यकर्त्यांची गर्दी अशा वातावरणात राज्याचे नवे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे नागपुरात प्रचंड जल्लोषात स्वागत करण्यात आले. भारतीय जनता पक्षाच्यावतीने नागपूर विमानतळ ते लक्ष्मीभुवन चौक या मार्गावर ही रॅली काढण्यात आली.

फडणवीस यांच्या स्वागतासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय नागपूर विमानतळावर मोठ्या संख्येने कार्यकर्ते एकत्र आले होते. फडणवीस यांनी विमानतळाबाहेरील डॉ. आंबेडकरांच्या पुतळ्याला अभिवादन केल्यानंतर रॅलीला प्रारंभ झाला. रॅलीच्या मार्गावर ठिकठिकाणी फडणवीसांचे विविध प्रकारे स्वागत करण्यात आले. अनेक ठिकाणी भाजपा महिला-पुरुष कार्यकर्त्यांनी प्रचंड फुले उधळली. याशिवाय, ठिकठिकाणी हार घालूनही त्यांचे स्वागत करण्यात आले. रॅडिसन ब्ल्यू चौकात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनीदेखील फडणवीस यांचे स्वागत केले.

यावेळी, फडणवीस यांच्यासह अमृता फडणवीस, मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, आशिष जयस्वाल, आमदार परिणय फुके, कृष्णा खोपडे, सुधाकर कोहळे, आशिष देशमुख, भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष डॉ. राजीव पोतदार, शहराध्यक्ष बंटी कुकडे रॅलीतील रथावर उपस्थित होते.

विमानतळ, डॉ. हेडगेवार चौक, राजीवनगर, जयप्रकाशनगर, छत्रपती चौक, स्वातंत्र्यवीर सावरकर चौक, आठ रस्ता चौक, लक्ष्मीनगर चौक, बजाजनगर चौक, शंकरनगर चौक या मार्गाने जाऊन लक्ष्मीभुवन चौकात रॅलीचा समारोप झाला. शहरा-तील सहाही विधानसभा मतदारसंघातील भाजपच्या कार्यकर्त्यांनी निरनिराळ्या चौकांमध्ये स्वागत कार्यक्रमांचे आयोजन केले होते. रिपब्लिकन पक्षाचे जयदीप कवाडे आणि त्यांच्या कार्यकर्त्यांनीही रॅलीचे स्वागत केले.

रॅलीच्या मार्गावर विविध ठिकाणी डीजे, बँड, ढोल-ताशे यांनी परिसर दणाणून सोडला. याशिवाय, कार्यकर्त्यांच्या आणि नागरिकांच्या 'जय भवानी, जय शिवाजी', 'जय श्रीराम' अशा घोषणांनीही रॅलीच्या उत्साहात भर घातली होती. याशिवाय, भजनी मंडळे, विविध वेशभूषेतील नागरिक आणि लहान मुलेही या स्वागतात सहभागी झाली होती. फडणवीस यांनी ठिकठिकाणी होत असलेल्या या स्वागताचा नागरिकांना अभिवादन करून स्वीकार केला. रॅलीच्या संपूर्ण मार्गावर भाजपचे तसेच भगवे झेंडे आणि फडणवीस यांच्या स्वागताचे फलक लावण्यात आले होते.

लक्ष्मीभुवन चौक येथे झालेल्या सभेत फडणवीस यांनी उपस्थितांना संबोधित केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात आणि कार्यकर्त्यांच्या बळावर महायुतीला विधानसभा निवडणुकीत मोठा विजय मिळाला आहे. ही सत्ता सेवा करण्याकरता आणि महाराष्ट्र बदलण्याकरता मिळाली आहे. सामान्य माणसाच्या जीवनात परिवर्तन करण्याकरता सत्ता मिळाली आहे. महाराष्ट्राची स्वप्ने पूर्ण करण्याकरिता माझ्यासह उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार आणि संपूण चमू एकदिलाने काम करेल. हे सरकार २४ बाय ७ नागरिकांकरता काम करेल, असे फडणवीस म्हणाले.

|| भावपुर्ण श्रद्धांजली ||



हणमंत गायकवाड
यांचे अल्पशा आजाराने निधन झाले.
ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो.

कमलाकर सोनकांबळे
( उपसरपंच गोगांव )
संपादक : दैनिक यश सिद्धि न्युज
तालुकाध्यक्ष : म . रा. मराठी पत्रकार संघ मुंबई
चेअरमन : सम्यक उद्योग समूह
संस्थापक : सिद्धार्थ सोशल फाउंडेशन
www.yashsiddhinews.com www.epaper.yashsiddhinews.com
yashsiddhinews@gmail.com 9921988358 | 7385319358

## संपादकीय....

### आसन व्यवस्थेची चर्चा

विधानसभेच्या निवडणुकीनंतर रविवारी राज्यात मंत्रिमंडळ विस्तार झालाय. महायुतीकडून आज एकून ३९ मंत्र्यांनी मंत्रिपदाची शपथ घेतली. यामध्ये काही नव्या चेहऱ्यांचा देखील समावेश आहे. विधानसभेच्या निवडणुकीमध्ये भाजपाचे १३२, शिवसेनेचे ५७ आणि एनसीपीचे ४० आमदार निवडून आले. विधानसभेच्या निवडणुकीमध्ये सर्वात मोठा पक्ष भाजपा ठरलाय. ५ डिसेंबर रोजी मुख्यमंत्रिपदाची शपथ देवेंद्र फडणवीस यांनी घेतली. देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांच्या नावात मुख्यमंत्रिपदासाठी रस्सीखेच सुरू असल्याचे सांगितले जात होते. १५ डिसेंबर रोजी देवेंद्र फडणवीस यांच्या मंत्रिमंडळाचा विस्तार नागपुरात झालाय. मंत्रिमंडळाच्या विस्तारावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यात एक जवळीकता बघायला मिळाली. दुसरीकडे मुख्यमंत्री फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांच्यात मोठे अंतर दिसून आले. यावेळी शिंदेंचा चेहरा बरेच काही सांगून जाताना देखील दिसला. ज्यामुळे विविध चर्चा रंगताना दिसत आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार एकाच मंचावर दिसले. मात्र, देवेंद्र फडणवीस यांच्या शेजारी अजित पवार बसले होते तर दुसरीकडे राज्यपालांच्या दुसऱ्या बाजूला एकनाथ शिंदे यांना बसवण्यात आले होते. शिंदे आणि फडणवीस यांच्यात इतके अंतर का? आणि अजित पवारांनाच शेजारी घेऊन देवेंद्र फडणवीस का बसले, याची जोरदार चर्चा ही रंगताना दिसत आहे. महायुतीत सर्वकाही अलबेल नसल्याची जोरदार चर्चा सुरू आहे. एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांच्यात काहीतरी बिनसले असल्याचेही सांगितले जातंय. मंचावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांच्यातील अंतर स्पष्टपणे दिसत होते. देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांच्यामध्ये यावेळी काही चर्चा देखील झाली नसल्याचे सांगितले जातंय. मुख्यमंत्रिपदासाठी अगोदर एकनाथ शिंदे यांचे नाव चर्चेत होते. मात्र, त्यानंतर आपण मुख्यमंत्रिपदाच्या शर्यतीमध्ये नसल्याचे सांगताना एकनाथ शिंदे हे दिसले होते.

# यश मिळविण्यासाठी नियमितपणे सरावाची गरज

## अॅड. प्रदीप वारुंगसे यांचे प्रतिपादन; मॅरेथॉन स्पर्धेतील विजयी विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सिन्नर/प्रतिनिधी:- कोणत्याही स्पर्धेसाठी नियमितपणे सराव करणे गरजेचे आहे. स्पर्धा या विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी आयोजित केल्या जातात. भविष्यातही विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धेत भाग घेवून उल्लेखनीय यश मिळवावे असे आवाहन अँड प्रदीप वारुंगसे यांनी केले.

नाशिक जिल्ह्याचे लोकप्रिय खासदार तथा डुबेरे येथील भूमिपुत्र राजाभाऊ वाजे तसेच श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे पतसंस्थेचे संस्थापक चेअरमन तथा पतसंस्था फेडरेशनचे कार्याध्यक्ष नारायणशेठ वाजे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून डुबेरे येथील जनता माध्यमिक व उच्च विद्यालयात मॅरेथॉन स्पर्धेच्या बक्षिस वितरणप्रसंगी अँड वारुंगसे बोलत होते.




एन.के. फाउंडेशन अध्यक्ष गणेश वाजे यांच्या संकल्पनेतून वाढदिवसानिमित्ताने दरवर्षी विद्यालयात मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे तालुका संचालक कृष्णाजी भगत यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी उपसरपंच अनिल वारुंगसे होते. व्यासपीठावर एन .के .फाउंडेशनचे अध्यक्ष गणेश वाजे, राम वारुंगसे, पत्रकार सुनिल जाधव,प्रदीप वारुंगसे, प्रवीण वामने , नवनाथ ढोली, नंदकिशोर माळी, पोलीस पाटील प्राध्यापक रामदास वारुंगसे,सागर जगधने ,जेष्ठ शिक्षक दिंगबर जाधव, कचेश्वर शिंदे, अलका काळोगे, विद्या ठाकरे, क्रीडाशिक्षक शिवाजी गुरुळे आदी उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते यशस्वी विद्यार्थ्यांना स्मृतिचिन्ह , शैक्षणिक साहित्य व गुलाबपुष्प देवून गौरविण्यात आले.विद्यालयाचे मुख्याध्यापक रामदास वाजे यांनी कार्यक्रमाचे आयोजन व नियोजन केले. विद्यालयातील चारशे विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत उत्स्फूर्तपणे प्रतिसाद नोंदविला. संस्कार ढोली,साहिल पेढेकर,रमेश उघडे,श्वेता सदगीर,खुशी गोफणे,दर्शना सदगीर आदींसह एकूण ३० विद्यार्थ्यांना बक्षीस देऊन गौरविण्यात आले . शारीरिक आणि मानसिक आरोग्यासाठी खेळाची गरज असल्याचे प्रतिपादन अनिल वारुंगसे यांनी केले.

यावेळी इयत्ता दहावी परीक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी माजी उपसरपंच अनिल वारुंगसे यांनी ११००/ रुपयांचे बक्षीस जाहीर केले .इयत्ता पाचवी ते बारावी पर्यंत विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवला. प्रास्ताविक रामदास वारुंगसे यांनी केले. सूत्रसंचालन सांस्कृतिक समितीचे प्रमुख पी.आर.करपे यांनी तर आभार सोमनाथ गिरी यांनी मानले.यावेळी रेखा खंडिझोड, सोमनाथ बोडके ,उत्तम कामडी,सुनिल ससाणे आदींसह शिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.



## म्हाळसाकोरे येथील आरूढ विद्यालयात सांस्कृतिक महोत्सव

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : म्हाळसाकोरे येथील मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेमार्फत आयोजित सांस्कृतिक महोत्सव निफाड तालुक्यातील केंद्रस्तरीय माध्यमिक गटातील प्रथम फेरीत म्हाळसाकोरे येथील आरूढ माध्य व उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये समुहगीत, समुहनृत्य,एकपात्री नाटक अशा विविध प्रकारच्या स्पर्धा पार पडल्या.

सकाळ सत्रात सांस्कृतिक महोत्सव कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मविप्र चे सभापती. बाळासाहेब क्षीरसागर होते. व्यासपीठावर मविप्र समाजाचे उपसभापती देवराम बाबुराव मोगल, निफाड तालुका संचालक शिवाजी गडाख,माध्यमिक सर्व शालेय समितीचे अध्यक्ष व सदस्य प्रकाशभाऊ बाजारे, अंबादास गवारे,प्राचार्य एस. के. शिंदे, उपमुख्याध्यापिका श्रीमती एम.के. आहेर, पर्यवेक्षक जी. एम. पोटे आदी मान्यवर उपस्थित होते. प्रास्ताविकातून प्राचार्य एस.के. शिंदे यांनी सांस्कृतिक महोत्सवाचा उद्देश विशद केला. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन,व नटराज, दानशूर डिसोझा बाबा यांच्या प्रतिमांचे पूजन केले. मविप्र संस्थेचे सभापती बाळासाहेब क्षीरसागर यांच्या शुभहस्ते सांस्कृतिक महोत्सव कार्यक्रमाचे उद्घाटन केले. याप्रसंगी कार्यक्रमाची नांदी गणपती, सरस्वती मातेला वंदन मंगलमय गीताने झाली. विद्यालयाच्या वतीने उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. यावेळी क्षिरसागर यांनी मनोगतात म्हणाले की कार्यक्रमांतून निश्चितच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन मिळणार आहे. अशा कार्यक्रमातून ग्रामीण भागातील एखादा कलाकार म्हणून भविष्यात पुढे येऊ शकतो. हाच खरा उद्देश आहे, शेवटी त्यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले, निफाड तालुका संचालक शिवाजी पा. गडाख यांनी मनोगत व्यक्त केले. केंद्र स्तरीय प्रथम फेरीत विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक स्पर्धामध्ये आपल्या कलागुणांचे उत्कृष्टपणे सादरीकरण करून उत्तम प्रतिसाद मिळवला. सुमधुर गीतांच्या तालावर ठेका धरत मुलांनी केलेला कलाविष्कार इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणादायी ठरला.

स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे...

१)समुहगीत १) जनता इंग्लिश स्कूल, सायखेडा. २) आरूढ विद्यालय, म्हाळसाकोरे. ३) जनता विद्यालय, करंजगाव. उत्तेजनार्थ खेडलेझुंगे व चाटोरी विद्यालयास मिळाले. एकपात्री नाटक १) आरूढ विद्यालय, म्हाळसाकोरे. २) जनता इंग्लिश स्कूल, सायखेडा. ३) जनता विद्यालय, दिंडोरी तास. उत्तेजनार्थ चाटोरी व नैताळे विद्यालयास मिळाले. समूहनत्य १) जनता इंग्लिश स्कूल सायखेडा २) आरूढ विद्यालय, म्हाळसाकोरे. ३) जनता विद्यालय, करंजगाव. उत्तेजनार्थ धारणगाव व चाटोरी विद्यालयास मिळाले.

दुपार सत्रात सांस्कृतिक महोत्सवात बक्षीस वितरण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मविप्र समाज संस्थेचे संचालक शिवाजी पा. गडाख होते. याप्रसंगी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते यशस्वी विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण करण्यात आले. स्पर्धोंमध्ये निफाड तालुक्यातील बारा संघांनी सहभाग घेतला होता. सांस्कृतिक स्पर्धेचे परीक्षक म्हणून दिनकर दांडेकर आणि गोविंद क्षीरसागर यांनी कामकाज पाहिले. सांस्कृतिक कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शकुंतला गिरी, लहू शेलार,विक्रम जाधव यांनी केले तर आभार समाधान खालकर यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक, शिक्षकेतर सेवक यांनी विशेष परिश्रम घेतले.

## परभणी येथे घडलेल्या घटनेच्या निषेधार्थ धाराशिव जिल्हाधिकारी यांना निवेदन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



धाराशिव: सुधाकर रणदिवे, दि. ११ /१२/२०२४ रोजी परभणी येथे केलेल्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व संविधानाच्या प्रतिमेच्या विटंबणेच्या निषेधार्थ आज सम्यक विद्यार्थी आंदोलन धाराशिव यांच्या वतीने मा. जिल्हाअधिकारी यांना निवेदन देण्यात आले.

परभणी येथे झालेल्या विटंबना प्रकरणातील अटक केलेल्या सोपान दत्ताराव पवार याच्यावर कडक कार्यवाही करावी व याच्या मागे कोणाचा हात आहे त्याचाही शोध घ्यावा व त्यांच्यावरही कडक कार्यवाही करावी म्हणून सम्यक विद्यार्थी आंदोलन यांच्या वतीने जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले. यावेळी शहराध्यक्ष विवेक जाधव,मनोज वाघमारे, चेतन मस्के ,रोहित वाघमारे,अभिषेक साबळे, रितेश गायकवाड, समाधान करपे व इतर कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

## विद्युत ट्रांसफार्मसाठी ३५ लाखाचा निधी : चिवटे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिफारसी अनुसार तालुक्यातील सहा ठिकाणी नवीन ट्रान्सफॉर्मर मंजूर झाले असून त्यामुळे या भागातील शेतकऱ्यांचा विजेचा प्रश्न सुटणार असल्याचे शिवसेनेचे जिल्हाप्रमुख महेश चिवटे यांनी सांगितले.



चिवटे शेवटी यांनी सांगितलेची शहरानगरच्या श्री कमलादेवी औद्योगिक सहकारी वसाहतीचे विद्युत दाब कमी असल्यामुळे उद्योगांना अडचणी येत होत्या येथे वाढीव दोन के के व्ही एस ट्रांसफार्मर बसवण्यासाठी नऊ लाख रुपये निधी मंजूर झाला आहे.

वाशिंबे येथील गायकवाड वस्तीवर ट्रांसफार्मर साठी चार लाख ४८ हजार रुपयेज्ञ येथील संतोष वस्ती घाडगे वस्तीत चार लाख रुपये १९ हजार रुपये कारंजा येथील काळे ग्रुप ट्रांसफार्मर साठी पाच लाख ७३ हजार रुपये. ओके गुड ट्रांसफार्मर साठी पाच लाख ५१ हजार रुपये जिथेतील रंधवे ग्रुप ट्रांसफार्मर साठी आठ लाख ८० हजार रुपये निधी मंजूर होऊन कामकाज प्रशासकीय कामकाजा मान्यता मिळाली आहे त्याचबरोबर माजी खासदार निंबाळकर यांच्या निधीतून २५ हाय मग हाय मस्त देवी मंजूर आहे

**अनेक ठिकाणी क्षमतेपेक्षा जास्त वीज असल्याने वीज कनेक्शन झाल्यामुळे ट्रान्सफॉर्म जळतात व शेतकऱ्यांना पाहिजे त्या दाबाने वीज मिळत नाही त्यामुळे आवश्यकता ट्रान्सफॉर्म व क्षमता वाढवण्यासाठी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद सकारात्मक असून ट्रान्सफॉर्मर क्षमतेत वाढ करण्यासाठी शिवसेना प्रयत्नशील आहे**

**– महेश चिवटे (जिल्हाध्यक्ष शिवसेना)**

## अनंत चैतन्य माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालय, हन्नूर येथे क्रीडा सप्ताहास प्रारंभ



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

हन्नूर/प्रतिनिधी : विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी व खास करून त्याच्या व्यक्तिमत्व विकासाला घडवण्यासाठी मैदानी खेळांचे आत्यंतिक महत्त्व आहे. आत्मसात केलेले कौशल्य दाखवण्याची संधी खेळाडूंना क्रीडास्पर्धेतून मिळते. म्हणूनच महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्था, अक्कलकोट संचलित अनंत चैतन्य माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालय, हन्नूर येथे प्रतिवर्षी वार्षिक आतंरवर्गीय क्रीडा स्पर्धांचेआयोजन केले जाते. त्याचाच एक भाग म्हणून याही वर्षी आजरोजी अत्यंत शिस्तबद्ध व चांगल्या पद्धतीने या वार्षिक क्रीडा सप्ताहास मोठ्या उत्साही वातावरणात प्रारंभ करण्यात आले.

सुरुवातीस उपस्थित सर्व व्यवस्थापकीय मंडळाचे प्रशालेच्या सांस्कृतिक विभाग सहाय्यिका सौ. स्वप्नाली जमदाडे मॅडम यांनी शब्दसुमनांनी स्वागत करुन क्रीडा महोत्सव आयोजित करण्यामागचा उद्देश प्रास्ताविकातून विषद केल्या. यानंतर संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कै. आदरणीय पंचप्पा कल्याणशेट्टी सरांच्या प्रतिमेचे सर्व मान्यवरांच्या उपस्थितीत संस्थेचे जेष्ठ संचालक श्री. शिवप्पा भरमशेट्टी यांच्या हस्ते पुजन करण्यात आले. यानंतर प्रशालेची विद्यार्थिनी कु. करुणा हेगडे हिने उपस्थित मान्यवरांना मानवंदना देऊन क्रीडा स्पर्धा सुरू करण्याची परवानगी मागितली व मान्यवरांच्या हस्ते क्रीडा ज्योत पेटवून उदघाटन कार्यक्रम संपन्न करण्यात आले.

यावेळी प्रशालेच्या खेळाडूंनी क्रीडा संचलनाद्वारे मानवंदना देऊन मान्यवरांचे स्वागत केले. यावेळी खेळाडूंनी क्रीडा शपथ घेऊन अत्यंत संयमाने, जिद्दीने व खिलाडूवृत्तीने खेळण्याची हमी दिली. यानंतर उपस्थित मान्यवरांचे प्रशालेचे मुख्याध्यापक श्री. अशोक साखरे, पर्यवेक्षक श्री. ज्ञानदेव शिंदे, जेष्ठ शिक्षिका सौ. मृदुलादेवी स्वामी यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत व सन्मान केल्यानंतर संस्थेचे जेष्ठ संचालक व मार्गदर्शक श्री. मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी खेळ हा मानवी जीवनाचा अविभाज्य भाग असून जीवनाच्या सर्वच क्षेत्रात खेळाचे खुप महत्त्व आहे. शिवाय खेळ माणसाचे चारित्र्य आणि व्यक्तिमत्त्व घडवण्यास मदत करते. याकरिता विद्यार्थ्यांनी शालेय जीवनापासून च विशिष्ट अशा प्रकारच्या खेळात पारंगत झाले पाहिजे असे आवाहन आपल्या मार्गदर्शनपर भाषणातून विद्यार्थ्यांना केले. तर आजची मुले लहान-लहान गोष्टीने तणावग्रस्त होतात. पालकांच्या मुलांविषयी च्या अति प्रेमापोटी, मुलांना पुरवत असलेल्या सर्व हट्टामुळे आजच्या मुलांना फक्त जिंकणे माहित आहे. हरण्यातून सावरण्याची शक्ती आजच्या मुलांमध्ये दिसून येत नाही मात्र खेळांमुळे तणावमुक्त होण्याची किमया साधण्याबरोबरच हार सुद्धा अत्यंत संयमाने पचवता येते तेंव्हा विद्यार्थ्यांनी खेळांना प्रथम प्राधान्य दिले पाहिजे. असे प्रतिपादन संस्थेच्या संचालिका सौ. शांभवीताई कल्याणशेट्टी यांनी यावेळी विद्यार्थ्यांना केले.

यानंतर संचालिका सौ. शांभवीताई कल्याणशेट्टी यांच्या हस्ते मैदानावर श्रीफल वाढवून व संस्थेच्या सी. ई. ओ. सौ. रुपाली शहा यांच्या हस्ते नाणेफेक करून खोखो सामन्यांना सुरूवात करण्यात आले. हन्नूरचे उपसरपंच व युवा नेते श्री.सागरदादा कल्याणशेट्टी यांनी भेट देऊन या प्रशालेत संपन्न होत असलेल्या वार्षिक क्रीडा महोत्सवास शुभेच्छा दिल्या.यावेळी क्रीडा विभाग प्रमुख श्री.शहाजी माने, सहायक श्री. सरदार मत्तेखाने, श्री. स्वामीनाथ कोरे, प्रा. रविंद्र कालीबत्ते, काशीनाथ पाटील, रमेश शिंदे, सहशिक्षक धनंजय जोजन, सुरेश जाधव, राजेंद्र यंदे,शशी अंकलगी, अब्दुलअझीझ मुल्ला उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्रसंचालन सौ. स्वप्नाली जमदाडे यांनी केले. तर आभार सौ. मल्लम्मा चप्पळगाव यांनी मानले.

## ते हात नेहमी पवित्र असतात जे प्रार्थनेपेक्षा सेवेला जास्त महत्त्व देतात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नाशिक/प्रतिनीधी : असं म्हणतात ते हात नेहमी पवित्र असतात जे प्रार्थनेपेक्षा सेवेला जास्त महत्त्व देतात याच अनुषंगाने जिथे कमी तिथे आम्ही या उक्तीवर चालणाऱ्या नमस्ते नाशिक फाउंडेशन नाशिक यांच्याकडून सामाजिक बांधिलकी जपत पेठ तालुक्यातील अतिदुर्गम आदिवासी भागातील विविध शाळांमध्ये ३०० हुन अधिक गरजू विद्यार्थ्यांना मोफत स्वेटर वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी आय जी पी (स्पेशल) दत्तात्रय कराळे, अशोका ग्रुपच्या सौ आशाताई कटारिया, नमस्ते नाशिक फाउंडेशनच्या अध्यक्षा स्नेहल देव, यांच्या हस्ते सर्व गरजू विद्यार्थ्यांना स्वेटर वाटप करण्यात आले, आपल्याला स्वेटर मिळणार व आता आपल्याला थंडी पासून संरक्षण मिळेल व ही वस्तू आज एका मोठ्या अधिकाऱ्यांकडून मिळणार याचा आनंद सर्व विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरती दिसून येत होता, शाळेच्या विद्यार्थ्यांकडून विविध प्रकारचे आदिवासी नृत्य व सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आले. कार्यक्रमाप्रसंगी आय जी पी दत्तात्रय कराळे सर ह्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना आपण कितीही मोठे झालो तरी आपल्या मूळ गावाला कधीच विसरायचे नाही असे सांगून सर्व विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले व गावातील स्वच्छतेचे व स्वागताचे कौतुक केले, रामभाऊ हरी इंपाळ ज्यांनी स्वमालकीची जागा कायमस्वरूपी तोंडवळ शाळेला दान केली यांचा विशेष सत्कार कराळे सर यांनी केला, आशाताई कटारीया यांनी संस्थेचे कौतुक केले.



### नमस्ते नाशिक फाउंडेशन नाशिकचे उपक्रम

सौ अलका पाटील, आयआयटी दिल्ली येथे शिक्षण घेणारी कृ श्रेष्ठ सोमवार, ,पोलीस निरीक्षक डी एम गोंदके, तुकाराम पांडूरंग भोये (माजी सरपंच आडगाव),पीएसआय के एम दरगुडे ,सोमनाथ नाटे, रतन गांगुर्डे, पेठ पोलीस स्टेशन अमलदार राम पवार, पि. सी. राहुल राऊत, पी. सी. आर. एच. पवार आदी मान्यवर कार्यक्रमास उपस्थित होते. सर्वप्रथम प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सरस्वती पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. स्नेहल देव नमस्ते नाशिक फाउंडेशन ह्या नेहमी आदिवासी दुर्गम भागातील घटकांसाठी विविध समाज उपयोगी उपक्रम राबवत असतात. आय जी पी दत्तात्रय कराळे यांनी संस्थेच्या कार्याचे विशेष कौतुक केले व यापुढेही असेच कार्य करत राहण्यासाठी शुभेच्छा दिल्यात. पेठ तालुका जिल्हा नाशिक तोंडवळ, रानविहीर, बेलपाडा, गायधोंड, आडगाव(बु), मंडणपाडा, ह्या गावांमध्ये हा कार्यक्रम पार पडला. कार्यक्रम पार पडण्यासाठी अशोका ग्रुप यांचे मोलाचे सहकार्य लाभले. संस्थेचे संदीप देव यानी कार्यक्रमासाठी विशेष परिश्रम घेतले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...

### स्वत:च्या फायद्यासाठी रक्कम वापरून अपहार केल्याप्रकरणी एकावर गुन्हा

सोलापूर (प्रतिनिधी) स्वतःच्या फायद्यासाठी रकमेचा वापर करून अपहार केल्याप्रकरणी एका जणाविरुद्ध सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.हि घटना सप्टेंबर २०२३ ते जून २०२४ दरम्यान पाथरूट चौक येथे घडली.याप्रकरणी तौसिफ म.शफिक बागवान (वय-३८,रा.साखर पेठ,बुर्ला कॉलेज जवळ) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून साहेब अनिस सय्यद (वय-२९,रा.शहेबाज हॉल मागे,नई जिंदगी) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की,वरील संशयित आरोपी याने हारूण ट्रेडर्स फर्मचे विक्री केलेले साहित्याची विक्री प्रतिनिधी म्हणून पैशाची वसुली केली.त्यानंतर फिर्यादी यांचा विश्वास संपादन करून त्याच्या पदाचा दुरुपयोग करून फिर्यादी यांच्या संमतीशिवाय स्वतःच्या फायद्यासाठी रकमेचा वापर करून आभार केला आहे.असे फिर्यादित म्हटले आहे. तपास पोसई.बनकर हे करीत आहेत.

### घरासमोर का थांबला असे विचारल्यावर मारहाण ; दोघांवर गुन्हा

सोलापूर (प्रतिनिधी) घरासमोर का थांबला असे विचारले असता संशयित आरोपी यांनी फिर्यादी यांना तू आम्हाला विचारणारा कोण असे म्हणून हाताने व बुक्क्यांनी मारहाण करून लोखंडी पाईपने फिर्यादी यांच्या डोक्यात मारून तुला बघून घेतो अशी धमकी दिल्याची फिर्याद तिपण्णा सिद्राम केंचनाळ (वय-३८,रा.धाकटी ईरण्णा वस्ती) यांनी सदर बझार पोलिस ठाण्यात दिली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून निलेश ऊर्फ ढोले माढेकर व सचिन माढेकर (रा. धाकटी ईरण्णा वस्ती) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.हि घटना १४ डिसेंबर रोजी सकाळी नऊ वाजता सुमारास धाकटी ईरण्णा वस्ती येथे घडली.या घटनेचा पुढील तपास पोलीस नाईक माडे हे करीत आहेत.

# जिल्ह्याच्या शेवटच्या घटकापर्यंत पीएम सूर्यघर योजनेची माहिती पोहोचवण्यासाठी प्रयत्न करावेत

## जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद; जिल्ह्यात रूफ-टॉप सोलरचे ७९२६ अर्ज मंजूर तर २११५ चे काम पूर्ण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (प्रतिनीधी):- पीएम सूर्यघर योजना ही भारत सरकारने सुरू केलेली एक महत्वकांक्षी योजना आहे. या अंतर्गत देशभरातील एक कोटी कुटुंबांना दरमहा ३०० युनिट पर्यंत मोफत वीज पुरवठा करण्याचे उद्दिष्ट आहे. तरी ही योजना सोलापूर जिल्ह्यातील शेवटच्या घटकापर्यंतच्या लाभार्थ्यांपर्यंत पोहोचावी यासाठी वीज वितरण कंपनीने योग्य नियोजन करून त्याची प्रभावी अंमलबजावणी करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात पीएम सूर्यघर योजना २०२४ जिल्हास्तरीय समितीच्या आढावा बैठकीत जिल्हाधिकारी आशीर्वाद बोलत होते. यावेळी वीज वितरण कंपनीचे अधीक्षक अभियंता सुनील माने, कार्यकारी अभियंता आशिष मेहता, रमेश राठोड, महाऊर्जा जिल्हा व्यवस्थापक प्रसन्न चित्रे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी ग्रामपंचायत इशादीन शेळकंदे उपस्थित होते.




जिल्हाधिकारी आशीर्वाद म्हणाले की पीएम सूर्य घर योजना अंतर्गत आज रोजी पर्यंत महावितरणच्या पोर्टलवर ७९६९ अर्ज प्राप्त असून त्यातील ७९२६ अर्जांना महावितरण्य मंजुरी दिलेली आहे व ५८११ सोलरचे काम सुरू असून २११५ सोलर चे काम पूर्ण झालेले आहे तरी उर्वरित रूप टॉप सोलर चे काम त्वरित मार्गे लावावे. व जिल्ह्यातील अन्य पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी वीज वितरण कंपनीने मोठ्या प्रमाणावर नागरिकांचे प्रबोधन करावे. गावोगावी जाऊन आपल्या लाईन स्टाफ मार्फत या योजनेचे महत्त्व नागरिकांना पटवून द्यावे. या योजनेअंतर्गत संपूर्ण जिल्ह्यात काम करणाऱ्या वेंडरची स्वतंत्र बैठक आयोजित करावी, असेही त्यांनी सुचित केले.

सद्यस्थितीत या योजनेची बँकाकडे प्रलंबित असलेल्या प्रकरणांची संख्या बँक निहाय जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक यांच्याकडून उपलब्ध करून घ्यावी. तसेच सर्व बँकांशी एक स्वतंत्र बैठक या योजनेच्या अनुषंगाने घेऊन त्यांना या योजनेअंतर्गत ची प्रकरणे विहित पद्धतीने त्वरित मंजूर करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिले. प्रारंभी वीज वितरण कंपनीचे अधीक्षक अभियंता सुनील माने यांनी पीएम सूर्यघर योजना जिल्ह्यात कशा पद्धतीने राबवली जात आहे याविषयी माहिती दिली. वीज वितरण कंपनीकडून २११५ काम पूर्ण झालेल्या रूट ऑफ सोलर च्या माध्यमातून ७.६५ किलो वॅट क्षमतेची वीज निर्मिती झाल्याचे सांगितले. तसेच जिल्ह्याच्या प्रत्येक नागरिकांपर्यंत पोहोचून त्यांना योजनेचा लाभ देण्यासाठी प्रयत्न केले जात असल्याचे सांगितले. तसेच सौर ग्राम योजनेअंतर्गत चिंचणी (पंढरपूर), धानोरे (माळशिरस), हिपळे (दक्षिण सोलापूर) या गावांची निवड करण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले.

**पीएम सूर्य घर योजनेविषयी-**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दिनांक १३ फेब्रुवारी २०२४ रोजी पीएम सूर्य घर मोफत वीज योजनेची घोषणा केली. ही योजना रुफ टॉप सोलर योजना आहे. या प्रकल्पाचे उद्दिष्ट दरमहा ३०० युनिट पर्यंत मोफत वीज पुरवठा करून १ कोटी घरांना प्रकाश देण्याचे उद्दिष्ट आहे. या योजनेअंतर्गत शासन अनुदान थेट लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करेल त्यांना सवलतीच्या दरात बँक कर्जही दिले जाईल यासाठी एक राष्ट्रीय ऑनलाईन पोर्टल तयार केले जाईल. यामध्ये सर्व प्रकारच्या सुविधा एकत्रित केल्या जातील एक प्रकारे हे पोर्टल इंटरफेस सारखे कार्य करणार आहे.

या योजनेचा शेवटच्या घटकापर्यंत प्रचार करण्यासाठी शहरी स्थानिक स्वराज्य संस्था आणि पंचायतींना त्यांच्या भागात ग्रुप टॉप सोलर सिस्टिमला प्रोत्साहन देण्यासाठी प्रबोधित करण्यात येईल. या शिवाय उत्पन्न वाढवणे, विज बिल कमी करणे आणि लोकांना रोजगाराच्या संधी निर्माण करणे हा योजनेचा उद्देश आहे. पी एम सूर्यघर योजना ही भारत सरकारने सुरू केलेली अत्यंत महत्त्वाकांक्षी योजना आहे.

**पात्रता-** या योजनेचा लाभ घेण्यासाठी स्वतःचे घर असणे आवश्यक आहे. घराच्या छतावर सोलर रुफ टॉप सिस्टिम बसवण्यासाठी पुरेशी जागा असणे आवश्यक आहे. योजनेसाठी अर्ज करणे आवश्यक असून कागदपत्रे जमा करणे ही आवश्यक आहे. अर्जदाराकडे वैद्य विद्युत कनेक्शन असावे. अर्जदाराने यापूर्वी कोणत्याही तर सोलर पॅनल सबसिडीचा लाभ घेतलेला नसावा.

**सबसिडी (अनुदान):-**

१. झिरो ते १५० युनिट पर्यंत विजेचा वापर, एक ते दोन किलो वॅट क्षमतेची सौर प्रणाली, सबसिडी तीस ते साठ हजार रुपये.

२. १५० ते १५० युनिट पर्यंत विजेचा वापर, दोन ते तीन किलो क्षमता सौर प्रणाली, सबसिडी ६० ते ७८ हजार रुपये.

३. ३०० पेक्षा जास्त युनिट विजेचा वापर, तीन किलो वॅट क्षमता सौर प्रणाली, सबसिडी ७८ हजार रुपये.

# जानवळ येथे बिबट्याला जेरबंद करण्यात वनविभागाला यश; १० तास चालले रेस्क्यू ऑपरेशन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भिवंडी प्रतिनिधी/मिलिंद जाधव : भिवंडी तालुक्यातील पडघा वनपरिक्षेत्राच्या हद्दीत असलेल्या जानवळ - लोनाड परिसरात एका गटारी मध्ये अडकुन पडलेल्या बिबट्याला दहा तासानंतर जेरबंद करण्यास वनविभागाला यश आले आहे.



जानवळ - लोनाड येथील एका धाब्यावर पहाटे आंघोळ करून आपल्या गाडीकडे जाणाऱ्या एका गोदाम कंपनीच्या बस चालकास बिबट्या दिसला त्यानंतर आरडाओरडा केल्यावर सदर बिबट्या पळून जाण्यासाठी गोदामाच्या बाजुला असलेल्या गटारीत शिरला आणी अडकून पडला यांची खबर स्थानीक ग्रामपंचायत पदाधिकारी, नागरीकांना मिळतात त्याची खबर पडघा वनविभाग व पोलीसांना देण्यात आली. त्यावरुन पडघा वनविभागाचे अधीकारी कर्मचारी यांनी सिसीटीव्ही फूटेज व परिसरात तपासला असता बिबट्याच्या पायाचे ठसे आढळून आल्यानंतर बिबट्याचा वावर असल्याचे निश्चित करण्यात आले व ज्या गटारीत बिबट्या शिरला होता त्या ठिकाणी ठाणे वनविभाग रेस्क्यू टीम, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बिबट्या बचाव पथक, स्थानिक ग्रामपंचायत, पडघा वनपरिक्षेत्र कार्यालय, पोलीस, यांच्या संयुक्त विद्यमाने अँटोमेटीक पिंजरा लावण्यात आला व आजूबाजूचा परिसर मोकळा करण्यात आला. शुक्रवारी दुपारी दोन वाजता रेस्क्यू ऑपरेशन सुरू करण्यात आले होते. १० तासानंतर रात्री १२ वाजता बिबट्या पिंजऱ्यात जेरबंद झाला आणी सर्वानीच सुटकेचा निश्वास सोडला. हा बिबट्या जेरबंद करण्यासाठी उपवनसंरक्षक सचीन रेपाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पडघा वनपरिक्षेत्र अधिकारी शैलेश देवरे वनपाल धनेश नेनकर, दिनेश फर्डे, मंगेश शिंदे, गणेश कर्मचारी साहेबराव पोटे, महेंद्र भेरे, विकास उमतोल, मस्ताराम पावरा, स्थानिक सरपंच सदस्य, पोलीस कर्मचारी यांनी मेहनत घेतली.

# व्हाईस ऑफ मीडियाचा अभिनव उपक्रम; अनेक विभागातील अधिकाऱ्यांचा केला सत्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब : सुधाकर रणदिवे, निवडणुक काळात मोलाची जबाबदारी पार पाडत पूर्ण वेळ देऊन केलेल्या कामाचे कोठेतरी कौतुक व्हावे या प्रांजळ हेतूने कळंब धाराशिव विधानसभेच्या निवडणुका यशस्वीपणे पार पाडणारे निवडणूक अधिकारी, कळंबचे उपविभागीय अधिकारी संजय पाटील तसेच कळंबचे तहसीलदार हेमंत ढोकले त्याचप्रमाणे कळंब पोलीस स्टेशनचे कर्तव्यदक्ष पोलीस निरीक्षक रवी सानप यांचा कळंब व्हॉइस ऑफ मीडियाच्या वतीने पुष्पगुच्छ व व्हॉइस ऑफ मीडियाचे सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी व्हाईस ऑफ मीडियाचे राज्य कार्यवाहक अमर चोंदे कळंब व्हाइस ऑफ मीडियाचे कार्याध्यक्ष रामरतन कांबळे, उपाध्यक्ष शिवप्रसाद बियाणी ,प्रसिद्धीप्रमुख दिपक माळी,येरमाळा येथील व्हॉइस ऑफ मीडियाचे दिपक बारकुल, दत्तात्रेय बारकुल, सुधीर लोमटे, बालाजी बारकुल, संतोष बारकुल ,सचिन बारकुल, कळंब येथील सलमान मुल्ला, राहुल गाडे, राजेंद्र कांबळे, आधी व्हॉइस ऑफ मीडियाचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.



## ग्रंथ पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी (एस.के.गायकवाड) : बुद्ध फुले शाहू आंबेडकर यांच्या विचारांचा प्रसार आणि प्रचारासाठी अलीकडेच प्रकाशित झालेल्या निवडक ग्रंथ किंवा पुस्तकांना ग्रंथ पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार असून साहित्यिक लेखकानी प्रकाशित पुस्तकाच्या तिनं प्रती सह दि.३० डिसेंबर २२४ पर्यंत प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन म.फुले आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर ग्रंथ पुरस्कार आणि विचार प्रसारक संस्था पुणे यांच्या वतीने करण्यात आले आहे.

म.फुले आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर ग्रंथ पुरस्कार आणि विचार प्रसारक संस्था पुणे यांच्या वतीने दरवर्षी महात्मा फुले आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर ग्रंथ पुरस्काराने निवडक ग्रंथ किंवा पुस्तकांना सन्मानीत करण्यात येते.या वर्षाच्या सदर ग्रंथ पुरस्कार सन २०२३-२०२४ पुरस्कारासाठी सदर संस्थेच्या वतीने प्रस्ताव मागविण्यात आले आहेत. तरी साहित्यिक लेखकाने जानेवारी २०२२ ते डिसेंबर २०२४ दरम्यान प्रकाशित झालेल्या पुस्तकाच्या तिनं प्रती सह दि.३० डिसेंबर २०२४ पर्यंत प्रस्ताव अध्यक्ष /सचिव म.फुले आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर ग्रंथ पुरस्कार आणि विचार प्रसारक संस्था , शुभकलश सोसायटी सर्वे नंबर ३३ प्लॉट नबर-४० फ्लॅट (खोली)नंबर-२०३ लेन नंबर-१३ विद्यानगर टिंगरे नगर पुणे-३२ या पत्त्यावर पाठविण्याचे आवाहन म.फुले आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर ग्रंथ पुरस्कार आणि विचार प्रसारक संस्था पुणे चे अध्यक्ष ॲड.एल.टी.सावंत सचिव प्रा.राजा सोनकांबळे,उपाध्यक्ष तुकाराम डावरे, शिवाजी डावरे, ग्रंथ पुरस्कार समिती प्रमुख प्रा.डॉ.दिपक गायकवाड यांनी केले आहे.

# सोलापूरच्या भारतीय बौद्ध महासभेतर्फे परभणी येथील संविधान प्रतिकृतीची तोडफोड करणाऱ्यावर कठोर कारवाई करा; जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (प्रतिनिधी) भारतीय बौद्ध महासभा संस्थापक बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय अध्यक्ष राजरत्नजी आंबेडकर महाराष्ट्र राज्याध्यक्ष अरुणाताई इंगळे जिल्हाध्यक्ष कमलाकर कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली परभणी येथील भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार विश्वरत्न महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळील संविधान प्रतिकृतीचा अवमान करणाऱ्या समाज विभागतक जातीवादी अवलादीवर कठोर कारवाई करावी तसेच त्या प्रकरणाची तातडीने सखोल चौकशी करून या मागील सूत्रधाराचा शोध लावून त्यांच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी सोलापूरचे जिल्हाधिकारी माननीय कुमार आशीर्वाद यांना दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया तर्फे करण्यात आली.

परभणी जिल्ह्यातील परभणी शहरांमध्ये घडलेल्या घटनेच्या प्रथम जाहीर निषेध करून निवेदन देण्यात येते की, दि. १०/१२/२०२४ रोजी परभणी शहरातील महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोरील संविधान प्रतिकृतीची तोडफोड जाणून बुजून किंवा माते फिरूच्या हस्ते करण्यात आलेली आहे. ते तोडफोड करणाऱ्या समाजकंटकाची योग्य ती चौकशी करून त्यांच्या पाठीमागील मास्टर माईंड गुन्हेगार कोण आहे ,व त्याच्या पाठी राख्या सहित आणि सोबतच्या सर्व गुन्हेगारावर कठोरात कठोर कारवाई करून महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या संविधानाचा सन्मान करावा अशी मागणी करण्यात आली .यावेळेस भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हाध्यक्ष कमलाकर कांबळे, प्रवक्ते दिलीप कदम, शहराध्यक्ष सुनील वाढवे, कोषाध्यक्ष रवींद्र कांबळे, श्रीकांत गाजघटे, केवल फडतरे, अनेक पद अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा चा जयघोष

## हभप. हरी गुरूजी लवटे महाराज यांचे प्रतिपादन

# विश्वाला तारण्यासाठी गुरूची सेवा करणे गरजेचे आहे



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उमरगा /प्रतिनिधी : उमरगा तालुक्यातील अचलबेट देवस्थान येथे दत्त जयंती निमित्त आयोजित प्रवचन सेवेतहभप. हरी गुरूजी लवटे महाराज बोलत होते. यावेळी रमेश दिक्षित, धाराशिव चे माजी खासदार रविंद्र गायकवाड, जिल्हा परिषदेचे गटनेते प्रकाश आष्टे, आमदार प्रवीण स्वामी, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष बाबा पाटील, अजिंक्य पाटील, पंचायत समिती माजी उपसभापती युवराज दाजी जाधव, अरूण भैय्या आकडे, रमेश मदरसे, पंडित मुळे, अमरबेट देवस्थान चे हभप. दिपक महाराज जाधव, तुकाराम माने, ज्ञानेश्वर महाराज बरमदे, ज्ञानेश्वर येवते, बंडू नेलवाडे, मगर बिराजदार, ज्ञानेश्वर माशाळकर, बाळासाहेब जांभळदारे, दामाजी बिराजदार, विठ्ठल दामोदरे, करणं कुन्हाळे, उमाचंद्र सुर्यवंशी, विठ्ठल तेलंग, आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना हभप. हरी गुरूजी म्हणाले की, गुरू चा जयजयकार करण्यासाठी गुरू परंपरा जपण्यासाठी प्रयत्न करावे, ब्रम्हा, विष्णू, महेश यांना गुरूसमान पहावे, गुरू शी एकनिष्ठ रहावे, ज्ञानेश्वर, तुकाराम, एकनाथ महाराज यासह अनेक संतांनी गुरू चे महत्व सांगितले आहे. जिवनात समाधान मिळविण्यासाठी कोणाची कोणासोबत संगत आहे. हीच संगत भविष्य ठरवते. वैचारिक पातळी ठरते. गुरू गुरू साधनेत असताना गुरूशी लिन व्हायला पाहिजे असे म्हणाले.

शेवटी बोलताना म्हणाले की, सद्गुरू काशीनाथ महाराज यांच्या नंतर सद्गुरू वैराग्यमुर्ती उज्वलानंद बाबा गुरूस्थानी आहेत. त्यांनी घालून दिलेला आदर्श सर्वांनी आत्मसात करून जिवन जगावे. ज्ञान देव म्हणे तरलो तरलो या ओवी प्रमाणे सदगुरू नाथ उदार असतात, गुरू शिष्याला उदार अंतःकरणाने भक्तांच्या मनातील इच्छा पूर्ण करतात. गुरू उदार असतात म्हणून गुरूचा साक्षात्कार होणे गरजेचे आहे असे ते म्हणाले.

यावेळी दत्त जयंती निमित्त सायंकाळच्या समयी दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा चा जयघोष करीत गुलालाची उधळण करून संपन्न करण्यात आले. सकाळच्या सत्रात हभप. जनार्दन हेबाडे गुरूजी यांचे प्रवचन सेवा संपन्न झाली. तद्नंतर देवस्थान पंचक्रोशीतील जवळपास दीडशे गावातील भजनक-यांनी सहभाग घेत हजेरी भजन सेवा संपन्न झाली. दुपारी पुणे येथील सुरमणी बाबुराव बोरगांवकर, मधुवंती बोरगांवकर यांनी संगीत भजन सेवा पार पडली.

यावेळी अचलबेट देवस्थान चे सर्व भावीक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## थोडक्यात...

### वाहनात ठेवलेल्या पाच एलईडी टीव्ही अज्ञात चोरट्याने पळवल्या

सोलापूर (प्रतिनिधी) वाहनात ठेवलेल्या पाच सॅमसंग कंपनीच्या एलईडी टीव्ही अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना दि.मे २०२३ रोजी डाळिंब संशोधन केंद्राजवळ घडली.एका वर्षानंतर याबाबत फौजदार चावडी पोलीस ठाण्यात श्रीकांत अरुण डांगे (वय-३४,मु.पो.उळे,तालुका दक्षिण सोलापूर) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध तब्बल एक वर्षानंतर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेची हकीकत अशी की,मे २०२३ मधील एका दिवशी (तारीख आठवत नाही) पहाटे पाच वाजण्याच्या दरम्यान पुणे सोलापूर कडे जाणाऱ्या सर्विस रोडवर डाळिंब संशोधन केंद्राजवळ फिर्यादी यांच्या ताब्यातील वाहन क्रमांक एमएच.१३. डीक्यू.४८०८ हे वाहन थांबून प्राताविधीसाठी गेले असता,वाहनाच्या मागील बाजूस हौदात ठेवलेल्या १ लाख ७१ हजार रुपये किमतीच्या पाच सॅमसंग कंपनीच्या एलईडी टीव्ही अज्ञात चोरट्याने चोरून नेल्या आहेत.असे फिर्यादीत नमूद आहे. तपास पोलीस नाईक भीमदे हे करीत आहेत.

### शिवीगाळ करून मारहाण ; एकावर गुन्हा

सोलापूर (प्रतिनिधी) शिवीगाळ करून मारहाण केल्याप्रकरणी एका जनाविरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.हि घटना १४ डिसेंबर रोजी सकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास सिद्धार्थ नगर येथे घडली.याप्रकरणी साईनाथ यादगिरी चिंताकिंदी (वय-३९,रा. सिद्धार्थ नगर) यांनी एमआयडीसी पोलीस ठाणे फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून गणेश यादगिरी चिंताकिंदी (वय-३७,रा.सिद्धार्थ नगर) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की,फिर्यादी यांच्या पत्नीने आईस तुम्हाला पाणी लवकर गरम करता येत नाही का असे म्हणाले असता,आईस का बोलली या कारणावरून गणेश याने फिर्यादी व तिच्या पत्नीस शिवीगाळ करून हाताने मारहाण केली.तसेच चुलीजवळ पडलेले लाकडाने फिर्यादीच्या हातावर मारून दुखापत केली आहे.असे फिर्यादीत म्हटले आहे.पुढील तपास पोलीस हवालदार पवार हे करीत आहेत.

### शहर पोलिसांची डायल ११२ यंत्रणा राज्यात ठरली अव्वल

सोलापूर : नागरिकांच्या सुरक्षेतेसाठी कोणतीही घटना घडल्यास पोलिस तात्काळ घटनास्थळी पोहोचावेत, यासाठी सोलापूर शहर पोलिस आयुक्तालयाची डायल-११२ ही यंत्रणा नोव्हेंबर महिन्यात राज्यात अव्वल ठरली आहे. दरम्यान,आपत्कालीन प्रतिसाद पथक (डायल-११२) सोलापूर शहर यांनी नोव्हेंबर महिन्यामध्ये विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने आचारसंहिता, राजकीय सभा, कायदा व सुव्यवस्थेचा महत्त्वाचा बंदोबस्त, पंतप्रधान, मुख्यमंत्री तसेच झेड प्लस सुरक्षा असलेल्या व्यक्तींचे महत्त्वाचे बंदोबस्त अशा अनेक पातळीवर मात करीत एक ते ३० नोव्हेंबरपर्यंत एकूण एक हजार ७०७ नागरिकांकडून डायल ११२ या हेल्पलाइनवर पोलिस मदत मागितली, त्यांना पोलिस आयुक्तालाच्या डायल-११२ पथकाने कमीत कमी वेळेत सरासरी ३७ सेकंदांमध्ये प्रतिसाद देत मदत दिली.

# अधिकाऱ्याचा हेतू आन.... लुटीचा सेतू

## इंदापूर तहसील कार्यालयात असलेले सेतूतील अधिकारी दिवसाढवळ्या करतात नागरिकांची लुट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी : अतुल सोनकांबळे नागरिकांना कमी पैशात विविध प्रकारच्या जलद सेवा देण्यासाठी शासनाने सेतू उपक्रम सुरू केला. मात्र, सेतू केंद्राकडूनच नागरिकांची आर्थिक लूट होत असल्याचे वास्तव पाहावयास मिळत आहे. सेतू केंद्रावर लक्ष ठेवणारे अधिकारीही या लुटीकडे 'अर्थ'पूर्ण दुर्लक्ष करत आहेत.

सेतू उपक्रमांतर्गत शासनाच्या विविध विभागांतर्गत नागरिकांना ई-प्रशासकीय सेवांचा लाभ दिला जातो. नाममात्र शुल्क आकारून या सेवा नागरिकांना दिल्या जातात. यासाठी सर्व सेतू केंद्रांना ठरावीक दर निश्चित करून देण्यात आले आहेत. मात्र, ठरावीक रकमेव्यतिरिक्त जादा रक्कम इंदापूर सेतू केंद्रांवरून आकारली जात आहे. या सर्व सेतू केंद्रांवर नियंत्रण व देखरेख ठेवण्यासाठी तहसील कार्यालयात स्वतंत्र कक्ष कार्यान्वित आहे. नायब तहसीलदार दर्जाच्या अधिकाऱ्याकडे




प्रमाणीकरणाची महत्त्वाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. त्यांना मदत म्हणून वेळप्रसंगी इतर नायब तहसीलदार स्वाक्षरीचे काम करीत असतात.

सद्य:स्थितीत महा ई-सेवा अंतर्गत सेतू केंद्र सुरू झाले आहेत, केंद्रांवर नियंत्रण ठेवण्यासाठी स्वतंत्र अधिकाऱ्याची नेमणूक केली असतानाही केवळ अर्थकारणापोटी सेतू केंद्राच्या मनमानीकडे दुर्लक्ष केले जात असल्याची वास्तविकता आहे.

आवश्यक कागदपत्रे

नॉन क्रिमिलेअर : ऑनलाइन अर्ज, प्रतिज्ञालेख, शाळा सोडल्याचा दाखला (टीसी), जातीचे प्रमाणपत्र, वडिलांची टीसी, वडील शासकीय सेवेत असतील तर फार्म नंबर १६ पगार पत्रकाची मूळ प्रत, रहिवासी पुरावे, ३ वर्षांचा / तलाठी अहवाल. जातीचे प्रमाणपत्र : ऑनलाइन अर्ज, प्रतिज्ञालेख, टीसी, बोनाफाइड, रहिवासी पुरावे अधिवास प्रमाणपत्र : प्रतिज्ञालेख, अर्ज, टीसी, जन्माचा दाखला, रहिवासी पुरावे. उत्पन्न दाखला : प्रतिज्ञालेख, ऑनलाइन अर्ज, तलाठी चौकशी अहवाल, रहिवासी पुरावे. पावती न पाहताच आधीकारी करतात सही प्रमाणपत्राच्या पाठीमागे पावती लावल्याशिवाय प्रस्ताव स्वाक्षरीसाठी सादर करायचा नाही, असा नियम आहे. पण, तहसील कार्यालयातील काही अधिकारी पावती न पाहताच प्रमाणपत्रावर सही करीत आहे. हा प्रकार अत्यंत गंभीर आहे.

### १०० ते १५० रुपयांनी होतेय लूट

**शासनाने प्रमाणपत्राचे दर ठरवून दिल्यानंतरही जादा पैसे सेतू केंद्राकडून घेतले जात आहेत साधारणपणे १०० ते १५० रुपयांनी सर्वसामान्य नागरिकांची आर्थिक लूट होत आहे. कुणीही प्रतिज्ञालेख घेऊन जा ओळखपत्र असल्याशिवाय प्रतिज्ञालेख देण्यात येऊ नये, असे शासनाचे स्पष्ट निर्देश आहे, तरीसुद्धा जादा पैसे घेऊन इंदापूरातील सेतू केंद्र संचालक प्रतिज्ञालेख बनवून देत आहेत. यामुळे कुणीही कुणाच्या नावाचा प्रतिज्ञालेख बनवू शकतो.**

### दाखल्यांचे दर व कालावधी

| प्रमाणपत्रे | निश्चित दर | मिळण्याचे दिवस |
|---|---|---|
| रहिवासी प्रमाणपत्र | ३२.४७ रुपये | ३ दिवस |
| उत्पन्न दाखला | ३२.४७ रुपये | ३ दिवस |
| वय व अधिवास | ३२.४७ रुपये | ३ दिवस |
| जात प्रमाणपत्र | ३२.४७ रुपये | १५ दिवस |
| प्रतिज्ञालेख | ३२.४७ रुपये | १ तास |
| नॉन क्रिमिलेअर | ५४.९४ रुपये | १५ दिवस |
| जन्म, मृत्यू दाखला | ३२.४७ रुपये | ३ दिवस |
| भूमिहीन दाखला | ३२.४७ रुपये | ३ दिवस |

**या नियमानुसार पैसे घेतले तर नागरीकाची लुट थांबेल परंतू तसं होताना सध्या तरी दिसत नाही.**

# निफाड पोलीस स्टेशनमध्ये दत्त जयंती उत्साहात साजरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/शहर प्रतिनिधी : निफाड येथे निफाड पोलीस स्टेशन व समस्त ग्रामस्थ यांच्या वतीने सालबात प्रमाणे याही वर्षी मोठ्या उत्साहात विविध कार्यक्रमांनी दत्त जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली असून निफाड पोलीस स्टेशनच्या आवारात असणाऱ्या दत्त मंदिरावर यावेळी आकर्षक अशी विद्युत रोशनी करण्यात आली होती, तसेच सत्यनारायण पूजेचे आयोजन करून विद्यमान आमदार दिलीप काका बनकर यांच्या हस्ते दत्तप्रभुंची महाआरती करण्यात आली, याप्रसंगी निफाड पोलीस स्टेशनचे पी आय गणेश गुरव, नगरसेवक सागर कुंदे ,निफाड पोलीस स्टेशनचे सर्व पदाधिकारी व कर्मचारी तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी पोलीस स्टेशनच्या आवारात उपस्थित भाविक भक्तांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले असून यावेळी भावीक भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. निफाड शहरात व परिसरात ही यावेळी विविध ठिकाणी दत्त जयंती उत्साहात साजरी करण्यात आली असून विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.



### आ.बनकर यांचे हस्ते दत्तप्रभुंची महाआरती

# साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळाच्या प्रशिक्षण योजनेसाठी इच्छुकांनी अर्ज करण्याचे आवाहन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका):- साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळामार्फत मांग, मातंग, मिनी-मादीग, मादींग, दानखणी मांग, मांग महाशी, मदारी, राधेमांग, मांग गारुडी, मांग गोराडी, मादगी व मादिगा या जातीतील गरजू घटकांचा आर्थिक उन्नतीसाठी, तसेच त्यांना स्वंयरोजगाराच्या अधिअधिक संधी उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने सन २०२४-२५ या वित्तीय वर्षासाठी साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळाच्यावतीने कौशल्य विकास उद्योजकता प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. इच्छुक तरुण -तरुणी व विद्यार्थ्यांनी दिनांक २५ डिसेंबरपर्यंत अर्ज सादर करावेत असे आवाहन साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक आर.एच चव्हाण यांनी केले आहे. मातंग समाजातील तरुण-तरुणींचे वाढते शैक्षणिक प्रमाण विचारात घेता, समाजातील गरजु तरुण-तरुणींना व्यवसाय प्रशिक्षण देऊन त्यांना उपजिविकेचे साधन उपलब्ध व्हावे या उद्देशाने साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळाच्यावतीने कौशल्य विकास उद्योजकता प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. सदर प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत खादी व ग्रामोद्योग आयोग,भारत सरकार,डॉ.बी.आर.आंबेडकर ग्रामीण प्रोद्योगीकी व प्रबंधन संस्था,नाशिक, मिटकॉन कन्सलटन्सी आणि इंजिनिअरींग सर्व्हीसेस लिमीटेड,शिवाजीनगर,पुणे, विज्ञान एवं प्राद्योगिक विभाग,सावित्रीबाई फुले विद्यापीठ,पुणे, केंद्रीय मधुमक्षिका पालन संशोधन आणि प्रशिक्षण संस्था,पुणे या चार शासकिय प्रशिक्षण संस्थांकडून विविध ट्रेडचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांसाठी पात्रता, निकष व अटी पुढीलप्रमाणे आहेत. विद्यार्थी मातंग समाजातील व तत्सम बारा पोटजातीतील असावा. त्याचे वय १८ ते ५० वर्षांदरम्यान असावे, यापूर्वी महामंडळाच्या कोणत्याही प्रशिक्षण योजनेचा लाभ घेतलेला नसावा. महाराष्ट्रातील रहिवासी असावा , वार्षिक उत्पन्न तीन लाखापेक्षा जास्त नसावे, एका कुटुंबातील एकाच व्यक्तीस सदर योजनेचा लाभ घेता येईल. प्रशिक्षणार्थीने आधारकार्ड जोडलेल्या बँक खात्याचा तपशील सादर करावा. प्रशिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या तरुण-तरुणी/विदयार्थ्यांनी महामंडळाचे जिल्हा कार्यालय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन,सात रस्ता,सोलापूर येथे संपर्क साधुन विहित नमुन्यात आवश्यक कागदपत्रांसह दिनांक १५ डिसेंबर ते २५ डिसेंबर २०२४ या कालावधीत कागदत्रांसह अर्ज सादर करावा. दिनांक २५ डिसेंबर २०२४ नंतर अर्ज स्विकारले जाणार नाहीत, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक श्री. चव्हाण यांनी केले आहे.

# अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रतिबंध अ‍ॅट्रॉसिटी अ‍ॅक्ट नुसार गुन्हा दाखल करुन न घेतल्याने मी महिला उद्योजक बारामती येथे करणार उपोषण



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर/प्रतिनिधी : अतुल सोनकांबळे

अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रतिबंध अ‍ॅट्रॉसिटी क्ट नुसार गुन्हा दाखल करुन न घेतल्याने मी उज्वला रामसिंग ठाकुर (लग्नापूवीचे नांव) रा. श्रीरामनगर, कसबा, बारामती, जि. पुणे मी अनुसूचित जाती पैकी महार या जातीची महिला उद्योजक असून, माझेवर बॅक ऑफ बडोदा बारामती शाखेचे व्यवस्थापक किरण जाधव, तत्कालीन व्यवस्थापक ललित निनाजी नाळे व मुख्य प्रबंधक विवेकसिंग चांदुल्य यांनी जातीय आकसातुन व जातीय व्देषातुन जातीय अत्याचार केलेला आहेत तरी या अनुषंगाने, मी दि. १६/१०/२०२४ रोजी बारामती शहर पोलीस स्टेशन, बारामती, उपविभागीय पोलीस अधिकारी, बारामती, तसेच वरिष्ठांना तकारी अर्ज देवून संबंधीत आरोपींवर अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंध अधिनियम १९८९ अन्वये कलम ३(१) (झ), ३ (१) (f़ि), ३(१)(ि), ३(१)(ि), ३(१)(ूल), ३(२) (ॅर) नुसार तसेच भारतीय न्याय संहिता २०२३ अन्वये फौजदारी गुन्हा दाखल करावा म्हणुन विनंती केली होती. अर्जाच्या अनुषंगाने बारामती पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक जी.आर. चेके यांनी मला दिनांक ०७/११/२०२४ रोजी माझे तक्रारी अर्जाच्या चौकशी करणेकामी व माझा जबाब नोंदविण्यासाठी बारामती शहर पोलीस स्टेशन येथे बोलावून माझा संगणकावर जबाब घेतला आहे. परंतु अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंध अधिनियम १९८९ चे कलम १८ ए चे उपकलम १ मधील (र), (ल) मधील अनिवार्य तरतूदीनुसार एखादया अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमातीच्या व्यक्तीवर अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंध अधिनियम १९८९ मधील कलम ३ मधील प्रस्तुत कायद्यातील कलम १८ ए चे उपकलम १ मधील (र), (ल) मधील अनिवार्य तरतूदीनुसार बँक ऑफ बडोदाचे व्यवस्थापक किरण जाधव, ललित नाळे व विवेकसिंग चांडुलय यांचेवर अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंध अधिनियम १९८९ अन्वये कलम ३(१)(ि), ३(१)(िं, ३(१) (ि), ३(१)(ि), ३ (१) (ूल), ३(२)(ॅर) नुसार गुन्हा दाखल करणे हे बंधनकारक असताना, बारामती पोलीस स्टेशनचे अधिकारी एफ. आय. आर. करण्यास टाळाटाळ करीत आहेत. त्यामुळे त्याचा फायदा संबंधीत आरोपींना होवुन माझेवर अन्यायाची तिव्रता दिवसेंदिवस वाढत चालली आहे. त्यामुळे मी व माझे कुटूंबिय प्रचंड दहशतीमध्ये गेलो असुन त्याचा परिणाम माझेसहित माझे सर्व कुटूंबियांच्या मानसिकतेवर होत आहे.

अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंध अधिनियम १९८९ अन्वये कलम १८ - ए चे उपकलम १ मधील (र), (ल) मधील अनिवार्य तरतूदीनुसार संबंधित आरोपी किरण जाधव, ललित नाळे व विवेकसिंग चांदुल्य यांचेवर तत्काळ अनुसूचित जाती व जमाती अत्याचार प्रतिबंध अधिनियम १९८९ अन्वये कलम ३ (१) (ि कलम ३ (१) (ल) पासून ते कलम ३ (१) (ूल) पर्यंत तसेच कलम ३(२) (ीं) पासून ते कलम ३ (२) (ींळळ) पर्यंत कोणताही अत्याचार झाला तर त्यावेळेस जातीय अत्याचार पीडिताने दिलेल्या तक्रारी अर्जावर कोणतीही चौकशी न करता लगेच एफ. आय.आर. नोदंवणे पोलीसांना बंधनकारक आहे. तसेच एफ.आय.आर. नोंदविण्यासाठी कोणत्याही वरिष्ठाच्या पुर्वपरवानगी अथवा मान्यतेची गरज नाही असे स्पष्टपणे नमूद केले आहे.

**दोषींवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा**

**भीमसैनिकांवर झालेले गुन्हे त्वरित मागे घ्या - संजय भैय्या सोनवणे**

# परभणी येथील संविधान प्रतिकृतीचा अवमानाचा इंदापूर येथे महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाकडून निषेध

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर/ प्रतिनिधी - अतुल सोनकांबळे : परभणी शहरामध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्या जवळील भारतीय संविधानाच्या प्रतिकृतीची विटंबना काही समाजकंटकांनी केली. याच्या निषेधार्थ महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाच्या वतीने पक्षप्रमुख मा. संजय भैय्या सोनवणे यांच्या नेतृत्वात इंदापूर तहसील कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला.

यावेळी दोषींवर कडक कारवाई करुन देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा, भिमसैनिकांवरील गुन्हे तत्काळ मागे घ्यावे , भीमसैनिकांवर झालेले गुन्हे त्वरित मागे न घेतल्यास महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाच्यावतीने महाराष्ट्रभर तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा देण्यात आला आहे.

या मागणीचे निवेदन इंदापूर चे तहसीलदार मा. जिवन बनसोडे साहेबांना देण्यात आले. यावेळी महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाचे इंदापूर तालुक्यातील सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.




# परभणी येथील घटनेतील आरोपींवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करा, वंचित बहुजन आघाडीची मागणी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

करमाळा/प्रतिनिधी : परभणी येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याच्या शेजारील बाजूंस असणाऱ्या संविधानाच्या प्रतिकृतीची विटंबना केली आहे त्या नराधमावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा अशी मागणी आज वंचित बहुजन आघाडीच्या वतीने करण्यात आली अशा असायचे मागणी चे पत्र करमाळा तहसीलदार यांना देण्यात आले.

यावेळी जिल्हा उपाध्यक्ष सुभाष ओव्हळ जि सं देविदास भोसले शहराध्यक्ष विशाल लोंढे युवा आघाडीचे तालुका उपाध्यक्ष संभाजी कांबळे ता संघटक शिवाजी भोसले एकनाथ शिंदे दादासाहेब भोसले ब्रह्मदेव काळे आण्णासाहेब महनवर सचिन घोडके व महिला आघाडीच्या तालुका अध्यक्षा संगीता गायकवाड व इतर कार्यकर्ते व महिला उपस्थित होते.